शिक्षण सेवक पदी नियुक्ती झाल्याने
कार्यमुक्त करणेबाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर

सामान्य प्रशासन विभाग-१

जिल्हा परिषद आदेश क्रं.साप्रवि-१/आस्था-४/२९/३६५/२०२५

अहिल्यानगर दिनांक - ०४/०८/२०२५

वाचा:- १. उपायुक्त तथा सदस्य सचिव, शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी(TAIT) २०२२ समिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे-०१ यांचेकडील शिक्षण सेवक पदासाठी जा.क्र.मरापप/बापवि/२०२३/५४० दि. ३१/०१/२०२३ रोजीची जाहिरात

२. श्रीम. भारती आधार तिरमली, परिचर यांचेकडील पत्र दि. ०४/०२/२०२३

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र जा.क्र. वशि/आस्था-१/३२७/२०२३ दि. १४/०२/२०२३

४. मानद सचिव, हिंद सेवा मंडळ, अहिल्यानगर यांचेकडील नियुक्ती आदेश क्र. १९५/२०२५-२०२६ दि. ३०/०७/२०२५

५. श्रीम. भारती आधार तिरमली, परिचर यांचेकडील पत्र दि. ०४/०८/२०२५

६. प्रा. आ. केंद्र ब्राम्हणवाडा, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांचेकडील पत्र जा. क्र. आरोग्य विभाग/कार्यमुक्त/१६४/२०२५ दि. ०४/०८/२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये श्रीम. भारती आधार तिरमली, परिचर यांनी संदर्भ क्र.१ अन्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये **पवित्र** या संगणकीय प्रणालीव्दारे शिक्षक भरती करीता **शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी** (TAIT) २०२२-२३ या परीक्षेचे ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज मागविण्यात आले होते.

संदर्भ क्र. २ अन्वये श्रीम. भारती आधार तिरमली, परिचर यांनी शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) २०२२-२३ परीक्षेस बसण्यास परवानगी मागितलेली होती. संदर्भ क्र. ३ अन्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांनी श्रीम. भारती आधार तिरमली, परिचर यांना **शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी** (TAIT) **२०२२-२३** या परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात आली होती.

उपरोक्त संदर्भ क्र. ४ च्या आदेशान्वये श्रीम. भारती आधार तिरमली, परिचर यांना दादा वामन जोशी नवीन **मराठी शाळा श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर** येथे **शिक्षण सेवक** म्हणून पदस्थापना देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. ५ व ६ अन्वये श्रीम. भारती आधार तिरमली, परिचर यांची शिक्षण सेवक पदी निवड झाल्याने कार्यमुक्त करणे बाबत विनंती अर्ज प्रा. आ. केंद्र ब्राम्हणवाडा, ता. अकोले मार्फत प्राप्त झालेला आहे.

सदर पदावर हजर होणे कामी शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/०८ दिनांक २ डिसेंबर १९९७ नुसार श्रीम. भारती आधार तिरमली, परिचर यांना आज **दिनांक ०४/०८/२०२५** रोजी कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त करणेत येत आहे. तरी संबधीताच्या मुळ सेवा पुस्तकात सदर आदेशाची नोंद घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय संकेतांक 20250804040135 असा आहे.

(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्रीम. भारती आधार तिरमली, परिचर
द्वारा व प्रत — प्रा. आ. केंद्र ब्राम्हणवाडा, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

२/- सदरचा आदेश संबंधीतास बजावुन दिनांकित स्वाक्षरीची पोहोच व श्रीम. भारती आधार तिरमली, परिचर यांना कार्यमुक्त केलेल्या आदेशाची प्रत या कार्यालयास पाठवावी.

प्रत — १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले, ता. अकोले, जि. अहिल्यानगर
२. निवड नस्ती

(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर